# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि/गांधी जयंती/२०१८/4516 दिनांक:- 22 OCT 20

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,

संचालक/प्राचार्य,

व्यावसयिक अभ्यासक्रमाच्या सर्व शासकीय, अनुदानित व विना अनुदानित

पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,

पुणे विभाग.

विषय :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कार्यक्रम आराखडा तयार करणे

संदर्भ :- १. शासन परिपत्रक उ.व तं.शि.विभाग क्र.संकीर्ण -२०१८/प्र.क्र.४३/समन्वय/ दिनांक १४.०९.२०१८

२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्र.१६/गांधी जयंती/२०१८/५६१ दिनांक १७.०९.२०१८

३. या कार्यालयाचे पत्र क्र.तंशि/विकापु/२०१८/४०९० दिनांक २०.०९.२०१८

४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१६/गांधी जयंती१५०/२०१८/७११ दिनांक २२.१०.२०१८

उपरोक्त विषयासंदर्भात तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१६/गांधी जयंती१५०/२०१८/७११ दिनांक २२.१०.२०१८ नुसार संदर्भाधीन पत्रात नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त वर्षभराच्या (२ ऑक्टोबर २०१८ ते २ ऑक्टोबर २०१९) कार्यक्रम आराखड्याबाबतची माहिती खालील प्रपत्राप्रमाणे भरून दिनांक २३.१०.२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत Excel sheet मध्ये (soft copy) या कार्यालयाच्या ई-मेल info.ropune@gmail.com वर सादर करावी. **सदर माहीती शासनास सादर करावयाची असल्याने प्रथम प्राधान्याने न चुकता सादर करावी.**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कृती आराखडाबाबतची एकत्रित माहिती

| संस्थेचे नाव व डीटीई कोड | दिनांक १७.०९.२०१८ च्या पत्रामध्ये नमूद कार्यक्रम क्रमांक | कार्यक्रम राबविण्याचे ठिकाण | कार्यक्रम राबविण्याचे वेळापत्रक/कालावधी |
|---|---|---|---|
| | | | |

सोबत संदर्भिय पत्रांच्या छायाप्रती जोडत आहे.

22/10/18

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६२०६०२, २२६४११५०/५१,     फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH     E-mail desk16.dte@gmail.com     Internet http/www.dte.org.in

तातडीचे / महत्वाचे

क्र.:१६/गांधी जयंती'१५०/२०१८/७११

दिनांक :२२/१०/२०१८

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर.

विषय:-राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कृती आराखडा तयार करण्याबाबत...

संदर्भ:-१) शासन परीपत्रक उ.वत.शि.विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/समन्वय, दिनांक १४/९/२०१८

२) या कार्यालयाचे क्र.:१६/गांधी जयंती'१५०/२०१८/५६१, दिनांक १७/९/२०१८ चे पत्र

उपरोक्त विषयासंदर्भात माननीय केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री यांनी दिनांक ७/९/२०१८ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत. तसेच संचालक, तंत्रशिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांना संपूर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेले आहे.

सदर प्रकरणी या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ मध्ये नमूद दिनांक १७/९/२०१८ च्या पत्रान्वये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त एकुण १ ते १४ अनुक्रमांकावर नमूद कार्यक्रमाचा कृती आराखडा तयार करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, अद्यापपर्यंत काही विभागांचा मुद्देनिहाय कृती आराखडा अद्याप अप्राप्त आहे तसेच काही विभागांनी सादर केलेली माहिती एकत्रित केलेली नसल्याने शासनास सदर आराखडा सादर करणे अडचणीचे होत आहे.

तरी आपल्या विभागाअंतर्गत राबविण्यात यावयाच्या दिनांक १७/९/२०१८ मध्ये नमूद एकुण १ ते १४ अनुक्रमांकावर नमूद कार्यक्रमाचा कृती आराखडा खालील प्रपत्रामध्ये संकलित करुन तात्काळ उलटटपाली सादर करण्यात यावा.

सदर प्रकरणी उपरोक्त कार्यक्रमाच्या आराखड्याची माहिती पुस्तिका ग्रामविकास विभागास सादर करणेसाठी शासनाकडून दिनांक २२/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये तात्काळ माहिती सादर करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कृती आराखडाबाबतची विभागनिहाय एकत्रित माहिती

विभागाचे नाव:-

| दिनांक १७/९/२०१८ च्या पत्रामध्ये नमूद कार्यक्रम क्रमांक | कार्यक्रम राबविण्याचे ठिकाण | कार्यक्रम राबविण्याचे वेळापत्रक / कालावधी |
|---|---|---|

( डॉ. अभय वाघ )

संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई

प्रत:-१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दुरध्वनी क्रमांक. ०२० २५६५६२३४, ईमेल ropune.dte@gmail.com

जा.क्र.तंशि/विकापु/विवि/२०१८/4090 दिनांक - २०/०९/२०१८

प्रति,

प्राचार्य
सर्व शासकीय /अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित
पदविका,पदवी,पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग पुणे.

विषय - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त कार्यक्रम आराखडा तयार करणे.

संदर्भ - तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई यांचे परीपत्रक क्र.१६/गांधी जयंती १५०/२०१८/५६१ दिनांक १७/०९/२०१८

| अ. क्र. | कार्यक्रमाचे स्वरूप | मार्गदर्शक तत्वे | कार्यक्रमाची स्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत नाटक,निबंध,वक्तृत्व स्पर्धा आयोजित करणे. | या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग करून घ्यावा. उत्कृष्ट कार्यक्रमासाठी बक्षीस काढण्यात यावीत. | संस्थेमध्ये सर्वसाधारणपणे पंधरा दिवसात १ स्पर्धा होईल असे नियोजन करावे. |
| ०२ | श्रमदान व स्वच्छता अभियान | परीसराची,वर्गखोल्या,प्रयोगशाळा इ. अंतर्भाव असावा. | प्रत्येक आठवडयातुन २तास स्वच्छता अभियान राबावावे. |
| ०३ | महात्मा गांधी यांच्या जीवनावर भजन,गीत गायन कार्यक्रम | या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग करून घ्यावा. उत्कृष्ट कार्यक्रमासाठी बक्षीस काढण्यात यावीत. | संस्थेमध्ये सर्वसाधारणपणे पंधरा दिवसात १ स्पर्धा होईल असे नियोजन करावे. |
| ०४ | खेडे दत्तक घेणेबाबत | संस्थेमध्ये कार्यरत एनएसएस पथकाची मदतीने संस्थेच्या परीसराच्या जवळपासच्या खेडयाची निवड करावी व त्या खेडयाचा विकासाच्या दृष्टीने अहवाल तयार करावा. | संस्थेने किमान १ खेडे वा गांव दत्तक घ्यावे. |
| ०५ | वर्धा,पवनार,पुणे मुंबई या ठिकाणी पदयात्रा आयोजित करून जनजागृती करणे. | या कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी विद्यार्थीनीचा सहभाग करून घेवून पदयात्रा काढण्यात यावी. | प्रत्येक संस्थेने पदयात्रा काढून जनजागृती करावी. |
| ०६ | संस्थांनी महात्मा गांधीच्या विचारांवर राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर प्रसिध्द व्यक्तींना भाषण देण्यासाठी आमंत्रित करावे. | संस्थांनी महात्मा गांधीच्या विचारांवर राज्यस्तर प्रसिध्द व्यक्तींना भाषण देण्यासाठी आमंत्रित करावे.व या कार्यक्रमास विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे | संस्थास्तरावर ०१ प्रसिध्द व्यक्ती आमंत्रित करून भाषण आयोजित करावे |
| ०७ | महात्मा गांधी यांच्या जीवनावर / विचारावर भितीचित्रे तयार करून प्रदर्शन करावे. | महात्मा गांधी यांच्या जीवनावर / विचारावर भितीचित्रे तयार करून प्रदर्शित करण्यासाठी स्वतंत्र सुचना फलकाची व्यवस्था करावी. | महात्मा गांधी यांच्या जीवनावर /विचारावर भितीचित्रे तयार करून प्रदर्शित करणेसाठी विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग करून घेण्यात यावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०८ | संस्था व महाविद्यालयांनी त्यांच्या [illegible] गांधीच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहीलेली पुस्तके मोड्या प्रमाणात वाचनासाठी उपलब्ध करून देणे. | संस्था/महाविद्यालयातील ग्रंथपाल सहायक ग्रंथपाल यांनी जातीने लक्ष घालून ग्रंथालयात सदर पुस्तके उपलब्ध करून देणेबाबत कार्यवाही करावी. | या कार्यक्रमासाठी ग्रंथालय / वाचनालय जास्तीचे वेळेसाठी खुले ठेवण्यात यावे. |
| ०९ | म.गांधीचे सामाजिक कार्य व विचारांचा महाराष्ट्र राज्यात प्रचार व [illegible] दृष्टीने दिनदर्शिका तयार करावी. | संस्था व महाविद्यालयांनी या कार्यक्रमाबाबत नियोजन करून वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्याप्रमाणे अनुपालन करावे. | विभागीय कार्यालयाकडून याबाबत नियमित आढावा घेण्यात यावा. |
| १० | बिहार शासनाने म.गांधीच्या जीवनावर प्रसिध्द केलेले बापू की कहानिया या पुस्तकाचे मराठी भाषांतर करून ग्रंथलयात वाचनासाठी उपलब्ध करून द्यावे. | संस्था महाविद्यालयांनी याबाबत कार्यवाही करावी. | वाचनासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावे. |
| ११ | संस्था महाविद्यालये यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली/पदयात्रा आयोजित कराव्यात व त्यात विद्यार्थ्यांना सहभाग करून घ्यावा. | सदर कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थ्यींनी चा सहभाग करवून घ्यावा. | संस्था महाविद्यालयांनी शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थ्यीनी यांचा सहभाग करून रॅली पदयात्राचे नियोजन करावे. |

सर्व पुणे विभागातील संस्था व महाविद्यालयांनी उपरोक्त मार्गदर्शक तत्वानुसार विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने दिनदर्शिका तयार करून विभागीय कार्यालयास सादर करावी व त्यानुसार सर्व उपक्रम राबविण्यात येईल याचे नियोजन करावे. तसेच केलेल्या उपक्रमाबाबत वेळोवेळी दैनंदिन अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदरची माहिती info.ropune@gmail.com पाठविण्यात यावी

20/8/18

सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत - मा.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk16.dte@gmail.com Internet :http/www.dte.org.in


परीपत्रक

क्र.:१६/गांधी जयंती'१५०/२०१८/५६१
दिनांक : 17 SEP 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर.

विषय:-राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त आराखडा तयार करण्याबाबत...
संदर्भ:- शासन परीपत्रक उ.वतं.शि.विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४३/समन्वय, दिनांक १४/९/२०१८

उपरोक्त विषयासंदर्भात माननीय केंद्रीय मानव संसाधन विकास मंत्री यांनी दिनांक ७/९/२०१८ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्त वर्षभराचा कार्यक्रम आयोजित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच संचालक, तंत्रशिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांना संपूर्ण कार्यवाहीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेले आहे.

तरी आपण आपल्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये खाली देण्यात आलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी. व त्याबाबत विनाविलंब संपूर्ण तपशीलासह संचालक, तंत्रशिक्षण यांना अवगत करावे.

१) महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारीत सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी राज्यस्तर व राष्ट्रीयस्तरावर नाटकांचे रंगमंचावरील कार्यक्रम, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात.
२) स्वच्छता अभियानांतर्गत कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.
३) श्रमदानाचे कार्यक्रम सर्व विद्यापीठे, महाविद्यालय तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी आयोजित करावेत.
४) मानव संसाधन विकास विभागाने, महाराष्ट्राशी ज्या दुसऱ्या राज्याची जोड ठरवून दिलेली आहे, त्या राज्याशी संपर्क करुन विद्यार्थ्यांची देवाण घेवाण कार्यक्रम राबविणे.
५) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांचे गीत गायनाचे / भजन गायनाचे कार्यक्रम आयोजित करावेत.
६) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी या कालावधीत एक खेडे दत्तक घेऊन तेथील सामाजिक केंद्रांमध्ये स्वच्छता अभियान व स्वच्छ भारत अभियान यांची माहिती देऊन तो उपक्रम राबवावा.
७) महात्मा गांधींचा त्यांच्या जीवन कालावधीत महाराष्ट्रातील ज्या स्थळांशी संपर्क आला उदा. वर्धा, पवनार, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी पदयात्रा आयोजित करुन जनजागृती करावी.
८) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या विचारांवर आधारीत वक्तृत्व स्पर्धा आयोजित कराव्यात. या विषयावर राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावर प्रसिध्द व्यक्तींना भाषणे देण्यासाठी आमंत्रित करावे.

९) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी विद्यार्थ्यांकडून सार्वजनिक ठिकाणी महात्मा गांधींच्या विचारांचे भित्तीचित्रे तयार करुन घ्यावीत व त्यांचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन करावे.

१०) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयांमध्ये महात्मा गांधींच्या जीवनावरील विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लेखकांनी लिहिलेली पुस्तके मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वाचकांसाठी उपलब्ध करुन द्यावीत. तसेच गुजरात,राजस्थान, बिहार इ.राज्यांनी महात्मा गांधींच्या विचारावर आधारीत काही पुस्तके प्रसिध्द केली आहेत, ती सुध्दा त्यांच्या वाचनालयात उपलब्ध करुन देण्यात यावीत.

११) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींचे सामाजिक कार्य व विचारांचा सर्व राज्यात प्रचार व प्रसार करण्याच्या दृष्टीने वार्षिक दिनदर्शिका तयार करावी व त्यानुसार तात्काळ कार्यवाही करावी.

१२) बिहार शासनाने महात्मा गांधींच्या जीवनावर प्रसिध्द केलेल्या बापू की कहानीया पुस्तकाचे मराठीत भाषांतर करून घेऊन ते पुस्तक सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या वाचनालयामध्ये उपलब्ध करुन देणे संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

१३) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी महात्मा गांधींच्या भजनांच्या गायनाचे कार्यक्रम या कालावधीत प्राधान्याने आयोजित करावेत.

१४) सर्व विद्यापीठे, महाविद्यालये तसेच उच्च शैक्षणिक संस्था यांनी त्यांच्या सर्व विद्यार्थ्यांच्या रॅली / पदयात्रा वेळोवेळी आयोजित कराव्या व त्यात सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग अनिवार्य करावा.

वरील सर्व कार्यक्रमांबाबत आपण स्वतः जातीने लक्ष घालून कार्यक्रम राबवावेत व प्रत्येक कार्यक्रमाचा तपशील छायाचित्र, व्हीडीओ यांना आपल्या स्तरावर योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी व याबाबतचा दैनंदिन अहवाल न चुकता श्रीमती सुचित्रा रणदिवे, सहा. संचालक व समन्वयक यांचेमार्फत संचालकांना आवश्यक त्या तपशीलासह सादर करण्यास यावा.

( डॉ. अभय वाघ )

संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.,मुंबई

प्रत:-१) मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना माहितीसाठी सादर

२) श्रीमती सुचित्रा रा. रणदिवे, सहा.संचालक व समन्वयक, यांना कळविण्यात येते कि, उपरोक्त कार्यक्रमाचा दैनंदिन अहवाल शासनास अद्ययावत माहितीसह कळविण्याची जबाबदारी आपली राहील. विभागिय कार्यालयांकडून प्राप्त अहवाल न चुकता शासनास दैनंदिनरीत्या सादर करण्यात यावा.